# बँकांचे खाजगीकरण थांबवा! जनतेचा पैसा वाचलाच पाहिजे!
# विजय मल्ल्याला अटक करा! कर्जबुडव्या कंपन्या जप्त करा!

## 'महान देशभक्त' विजय मल्ल्याचे कारनामे

मित्रहो, अगोदर काँग्रेसच्या आणि आत्ता भाजपाच्या पाठींब्याने राज्यसभेचे खासदार बनलेले 'महान' उद्योगपती, 'देशभक्त' विजय मल्ल्या हे देशातील बँकांना ९००० कोटींचा चुना लावून विदेशी पळून गेले आहेत. गेले २ वर्षे मल्ल्याचे नाव कर्ज बुडवल्यामुळे चर्चेत आहे आणि त्याच्याविरुद्ध सीबीआय ने लक्ष ठेवण्याची नोटीस काढलेली होती. तरीही तो पळून कसा गेला? राजकीय आशिर्वादाशिवाय हे कसे शक्य आहे? जर चोर (मल्ल्या) चोरी करून पळाला तर पहारेदार (सरकार) एकतर त्याला सामील आहे किंवा लायक नाही! मल्यांनी बँकांना चुना लावला हे तर दिसून आले पण, सावध व्हा, हे तर फक्त हिमनगाचे टोक आहे!

## तुमचे पैसे धोक्यात आहेत!

मोठमोठ्या कंपन्यांनी चालवलेले मिडीया चॅनेल्स तुम्हाला याबद्दल सावध करणार नाहीत. खरे तर बँकांच्या संकटाबद्दल जागतिकीकरणाच्या धोरणांचे खंदे पुरस्कर्ते, रिझर्व बँकेचे गव्हर्नर रघुराम राजन सुद्धा आता गप्प बसू शकत नाहीत. भारतातील बँका धोक्यात आहेत. तुमचा मेहनतीचा पैसा धोक्यात आहे.

**डिसेंबर २०१५ मध्ये नऊ सरकारी बँकांनी ११,२५१ कोटींचा तोटा जाहीर केला.** आजपर्यंतच्या भारतातील बँकाच्या इतिहासातील सर्वात मोठा तोटा बँक ऑफ बरोडाने त्रैमासिक ३,३४२ कोटींचा जाहीर केला. आय.डी.बी.आय. बँकेने २,१८४ कोटींचा तोटा जाहीर केला आहे. कॉर्पोरेशन बँक, बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँकेनेही तोटा जाहीर केला आहे. इतर बँकांचे नफे कोसळले आहेत. हे सर्व का होत आहे?

## कंपन्यांनी बुडवलेली कर्जे – लाखो कोटींच्या घरात!

याचे कारण स्पष्ट आणि सोपे आहे. आपल्या, जनतेच्या, पैशांवर चालणाऱ्या या बँका मोठमोठया कॉर्पोरेट कंपन्यांची लाखो कोटींची कर्जे माफ करत आहेत. **गेल्या ३ वर्षांमध्ये २९ सरकारी बँकांनी १.१४ लाख कोटींची कर्ज माफ केली आहेत**. २००४–२०१५ या काळात २.११ लाख कोटींची कर्ज बँकांनी माफ केली आहेत. हे `सत्कर्म' करणाऱ्या 'टॉप' बँकांमध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया, इंडियन ओव्हरसीज बँक, अलाहाबाद बँक, बँक ऑफ बडोदा, आय.डी.बी.आय. बँक, कॅनरा बँक, युको बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, सिंडिकेट बँक, इत्यादी सामील आहेत.

**गेल्या ३ वर्षांमध्ये दिलेली कर्जमाफी**

| | |
|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया | ४०,०८४ कोटी |
| पंजाब नॅशनल बँक | ९,५३१ कोटी |
| इंडियन ओव्हरसीज बँक | ६,२४७ कोटी |
| बँक ऑफ इंडिया | ४,९८३ कोटी |
| बँक ऑफ बडोदा | ४,८८४ कोटी |
| कॅनरा बँक | ४,५९८ कोटी |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ४,४४२ कोटी |
| अलाहाबाद बँक | ४,२४३ कोटी |
| सिंडिकेट बँक | ३,८४९ कोटी |
| ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स | ३,५९३ कोटी |

रिझर्व बँकेच्या मते बँकांची 'अकार्यक्षम मालमता' (Non-Performing Assets – NPAs) त्यांच्या एकूण मालमत्तेच्या एक तृतियांश वर जाऊन पोहोचली आहे. काही अंदाजांनुसार चिंताजनक रक्कम (Stressed Assets) ७ लाख कोटींच्या घरात आहे!

हे कर्ज परत न करणारे लोक कोण आहेत? यापैकी **बहुतेक सर्व कर्ज श्रीमंतांतील श्रीमंत आणि उच्च-मध्यमवर्गाकडे थकीत आहेत.** १ कोटी रुपयांपेक्षा जास्त कर्ज थकवणाऱ्यांचे प्रमाण आहे ७३%. सर्वात मोठ्या ३० कर्जबुडव्यांचे एकूण कर्ज आहे १.२१ लाख कोटी रुपये, जे बँकांच्या एकूण अकार्यक्षम कर्जाच्या ४०% आहे.

## कर्जबुडव्यांना अजून कर्ज

हे कमी नव्हते म्हणून की काय, बँका रिझर्व बँकेच्या 5/25 सारख्या तरतुदी अंदाधुंदपणे वापरत आहेत. या तरतुदींमुळे त्यांना कंपन्यांच्या कर्जांची पुनर्रचना करता येते आणि कर्ज 'कायमस्वरुपी हरित' ठेवता येतात. दर ५–७ वर्षांनी कर्जपुरवठा

करायचा आणि कर्जाची मुदत २०–२५ वर्षांपर्यंत वाढवायची असा तो मार्ग आहे. सोपं आहे अगदी! **बँका कंपन्यांना नवीन कर्ज देतात आणि कंपन्या या नवीन कर्जातून जुने कर्ज चुकवून टाकतात.** बँकांच्या अकार्यक्षम कर्जांमध्ये आणि पुनर्रचित कर्ज असणाऱ्या कंपन्यांमध्ये काही दिग्गज **देशसेवक कंपन्यांची नावे आहेत – अदानी पावर, रिलायन्स पावर, वेदांता, जयपी इन्फ्राटेक, जीएमआर, किंगफिशर एअरलाईन्स, इत्यादी.**

## इकडे आड, तिकडे विहीर

जर असेच चालू राहिले, तर तोट्यात गेलेल्या बँका कोसळू शकतात. बँका कोसळल्या तर जनतेचा पैसा बुडणार. बँका वाचवण्यासाठी सरकार स्वत:कडचे पैसे टाकून बँका वाचवू शकते, पण ते तर अजून वाईट होईल. कारण सरकारने जर पैसे टाकले तर तो आपल्या कराचा पैसा असेल. हा पैसा जनतेला अन्न, शिक्षण, आरोग्य, अशा सार्वजनिक सुविधा देण्यासाठी सरकारने खर्च करणे आवश्यक आहे. भारतात अगोदरच सामाजिक सेवांवर फारच कमी खर्च केला जातो – राष्ट्रीय उत्पन्नाच्या फक्त ७%. जगातील सर्वात कमी सामाजिक खर्च करणाऱ्या देशांमध्ये आपली गणती आहे. तर असा तुटपुंजा सार्वजनिक सुविधांचा पैसा बँकांना वाचवायला वापरणार. म्हणजे आपण निवड करायची आहे - बँक बुडून पैशांवर पाणी सोडायचे की आपल्या सार्वजनिक सुविधांवर (मुलांचे शिक्षण, ज्येष्ठांचे आजार, बससेवा, इ.) पाणी सोडायचे. दोन्ही पैकी कशाचीही निवड केली तरी, मूळ प्रश्न सुटतच नाही – कर्जबुडवे तर मोकाटच राहतील!

## चोर सोडून सन्याशाला सुळी: बँकाचे खाजगीकरण थांबवा



काही जण म्हणत आहेत की यामध्ये सार्वजनिक बँकांची कार्यपद्धती कारणीभूत आहे आणि या बँकांचे खाजगीकरण केले पाहिजे. त्यांच्या मते या बँकांमधील अधिकाऱ्यांनी योग्य काम केलेले नाही. खरेतर गेली २५ वर्षे हे चालू आहे. इतके दिवस कोणालाच समजले नाही का? वस्तुस्थिती ही आहे की सरकार आणि बँका मोठमोठ्या कंपन्यांच्या तालावर नाचत आहेत, आणि त्यामुळेच ही कर्जे देण्यात आली. रघुराम राजन म्हणतात की “श्रीमंत आणि कनेक्शन्स असलेल्या उच्चभ्रू कर्जबुडव्यांच्या मागे जाण्याची कोणाचीच इच्छा नाही.”

असे असूनही शिक्षा मात्र जनतेलाच देण्यात येत आहे. जनतेच्या संपत्तीला खाजगी कंपन्यांच्या हातामध्ये देण्याचे प्रयत्न चालू आहेत. सरकार अनेक बँकांमध्ये ४९% खाजगी गुंतवणुकीला परवानगी देत आहे. ५१% (म्हणजे बहुमत) पर्यंत खाजगीकरणाची पण चर्चा चालू आहे. वस्तुस्थिती ही आहे की मोठमोठ्या कॉर्पोरेट कंपन्यां लोकांच्या पैशावर ऐश करत आहेत. पण बँकांनाच बळीचा बकरा बनवण्याचा तर्क देणारे लोक कंपन्यांचे ‘कर्तृत्व’ लपवण्याचे काम करत आहेत. कंपन्यांची कर्जे वसूल न करता, उलट कर्जे बुडवणाऱ्या कंपन्यांच्या हातातच बँका देण्याचे नियोजन सरकार करत आहे.

## कंपन्या ताब्यात घ्या!

जर तुम्ही तुमच्या घराच्या कर्जाचे हप्ते नाही फेडले तर बँका काय करतात? उत्तर सोपे आहे आणि तुम्हाला माहित आहे. बँका तुमचे घर, रिक्षा, संपत्ती जप्त करतात. मग मोठमोठ्या कंपन्यांच्या बाबतीत हे का केले जाऊ शकत नाही? मोठमोठ्या कंपन्याच आज बँका चालवत आहेत आणि लोकशाही व्यवस्थेची खिल्ली उडवत आहेत हे तर स्पष्ट दिसत आहे. या अकार्यक्षम कंपन्यांना ताब्यात घेऊन त्यांचे राष्ट्रीयकरण केले गेले पाहिजे. विजय मल्ल्या, अंबानी, अदानीसारख्या लोकांना तेव्हाच योग्य संदेश जाऊ शकतो.


# लोकायत

**संपर्क पत्ता:** लोकायत, १२९ बी/२, सिंडिकेट बँकेसमोर, लॉ कॉलेज रोड, नळस्टॉपजवळ, एरंडवणे, पुणे – ४

*(या पत्त्यावर दर रविवारी संध्या. ५ ते ७:३० या वेळेत लोकायतची बैठक होते. बैठकीत आपलं स्वागत आहे.)*

अलका – 9067003838 | ऋषिकेश – 9423507864 | www.lokayat.org.in | lokayat.india@gmail.com

lokayat.india | lokayat.india | @lokayat | lokayatpune | abhivyakti.pune | KafilaOfficial



हे पत्रक अलका जोशी यांनी लोकायतसाठी बुधवार, दि. १६ मार्च २०१६ रोजी पुणे येथे प्रकाशित केले.